वर्ष १२ वे * अंक ४४ वा * गुरुवार, दिनांक ०३ एप्रिल २०२५ ते बुधवार, दिनांक ०९ एप्रिल २०२५ * रायगड * महाराष्ट्र * मुल्य २ रुपये * पृष्ठे

बातम्या आणि जाहिरातीसाठी
संपर्क साधा :- ८३६९३९४३७२
सा.रायगड लोकधारा वृत्तपत्र /
रायगड लोकधारा न्यूज चॅनल

अन्यायाला वाचा फोडणारे....
ज्वलंत एकमेव वृत्तपत्र....
रायगडसह मुंबई,नवी मुंबई मधून प्रकाशित...!
शब्दांना लेखणीची धार..!

# रायगड लोकधारा

RNI No. MAHMAR/2013/48622
संपादकः विजय चंद्रकांत गायकर

## अलिबाग तालुक्यात हजारो नागरिकांना टँकरमार्फत पाणी

# पाण्याचा दुष्काळ



सा.रायगड लोकधारा वृत्त/

**अलिबाग प्रतिनिधी :** रायगड जिल्ह्यात करोडो रुपये खर्च करून जलजीवन योजना राबविण्यात आली. त्यामुळे पाणी टंचाईची समस्या सुटेल, अशी आशा रायगडकरांना होती. मात्र, ही समस्या सोडविण्यास प्रशासन उदासीन ठरल्याचे चित्र समोर येत आहे. अलिबाग तालुक्यातील रेवस परिसरात पाण्याचा दुष्काळ सुरु झाला आहे. या गावांमधील एक हजारहून अधिक नागरिकांना टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे. दरम्यान, जिल्हा टँकरमुक्त करण्याच्या घोषणा प्रशानामार्फत केल्या जातात. त्याचबरोबर पाणी पुरवठ्याच्या वेगवेगळ्या योजना राबवून गावे, वाड्यांमधील नागरिकांना मुबलक पाणी पुरवठा देण्याचा प्रयत्न जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आला आहे. तरी देखील रायगडकरांना पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणावर भेडसावत आहे. जिल्ह्यात केंद्र सरकार पुरस्कृत जलजीवन योजना राबविण्यात येत आहे. रायगड जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागामार्फत या योजनेची अंमलबजावणी करण्यात आली असून प्रति व्यक्ती ५५ लीटर प्रमाणे पाणी देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. पाण्याचे स्त्रोत शोधून त्याद्वारे गावांतील नागरिकांना पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केला आहे. अनेक गावांमध्ये ही योजना राबवून विहीरी, पाणी साठवण टाकी बांधण्यात आली आहे. तरीदेखील काही गावे पाण्यापासून वंचित राहिली आहेत. सध्या उन्हाच्या झळा वाढल्याने धरणांतील पाण्याची पातळी कमी होत चालली आहे. त्यामुळे धरणांमधून माती मिश्रीत पाणी पुरवठा होत आहे. अनेक गावांमध्ये दोन ते तीन दिवस आड पाणी पुरवठा होत आहे. परिणामी ऐन उन्हाळी हंगामात नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. ही टंचाई दुर पान नं.२ वर...

> "रायगड जिल्ह्यातील ज्या गावे, वाड्यांमध्ये पाणी टंचाई आहे. त्या गावात टँकरद्वारे पाणी देण्याचा प्रयत्न केला जात आहे. जिल्ह्यात जलजीवन मिशन अतंर्गत वेगवेगळ्या योजना राबविण्यात आल्या आहेत. अनेक योजना पूर्णत्वास आहेत. काही योजनांची कामे प्रगती पथावर आहेत.– संजय वेंगुर्लेकर, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, रायगड जिल्हा परिषद"

# सरकारी जागांवर बेकायदेशीर व्यवसाय

**सा.रायगड लोकधारा वृत्त/उरण वार्ताहर :** उरणमध्ये सिडको, गुरचरण, पीडब्ल्यूडी, महसूल, मेरिटाईम बोर्ड, जेएनपीए, वक्फ बोर्ड यांसारख्या शासकीय जागांवर मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर व्यवसाय फोफावत आहेत. कोणतीही अधिकृत परवानगी न घेता बार, रेस्टॉरंट, बियर शॉपी, ढाबे, कंटेनर यार्ड, भंगार माफिया, सर्व्हिस सेंटर आणि पार्किंग व्यवसाय खुलेआम सुरू आहेत. प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही कारवाई होत नसल्याने या व्यवसायांचे जाळे दिवसेंदिवस वाढत आहे. अधिकारी वर्गाच्या दुर्लक्षामुळे भ्रष्टाचाराला खतपाणी मिळत असून औद्योगिक विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोल भावाने संपादित करण्यात आल्या आहेत. मात्र, आजही अनेक जमिनी मोकळ्या पडून आहेत. या जमिनींवर बेकायदेशीर व्यवसायांचा धंदा तेजीत सुरू आहे. कायदेशीर परवानगीशिवाय दारूची दुकाने, कंटेनर यार्ड आणि बियर शॉपी कशा सुरू आहेत, हा मोठा प्रश्न आहे. संबंधित




शासकीय अधिकाऱ्यांना तक्रारी दिल्या जात असल्या तरी त्यांच्याकडून कोणतीही ठोस कारवाई केली जात नाही. उलट, आम्हाला फक्त तीन वर्षे नोकरी करून पुढे जायचे आहे किंवा बदलीसाठी लाखोंचा खर्च झालाय, तो वसूल करायचा आहे, अशा कारणांची चर्चा होत आहे. त्यामुळे अधिकारी वर्ग कारवाईला टाळाटाळ करत असल्याचे बोलले जात आहे.

# पत्नीच्या छळाला कंटाळून पतीची आत्महत्या!

## उलवे येथील धक्कादायक घटना

सा.रायगड लोकधारा वृत्त/



**पनवेल प्रतिनिधी :** पत्नीकडून होणाऱ्या मानसिक छळाला कंटाळून पतीने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना पनवेल उलवे येथे घडली. राज बाळकृष्ण पोकळे असे या तरुणाचे नाव असून तो २८ वर्षांचा होता. राज पोकळे आणि त्याची पत्नी अक्षता दोघेही उलवे, सेक्टर-२४ मधील महाविर साई सुरत बिल्डींग मध्ये राहत होते. या दरम्यानच्या काळात अक्षताने दुसऱ्या व्यक्तीसोबत सुत जुळले होते. अक्षताने पती राज याच्याशी घटस्फोट न घेता, प्रेमसंबंध असलेल्या व्यक्तीसोबत विवाह उलवे पोलीस ठाण्यात पान २ वर

# पेण: लिफ्ट कोसळून अपघात, २ जखमी....



सा.रायगड लोकधारा वृत्त/

**पेण प्रतिनिधी :** इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन फक्त दीड वर्षे झालेल्या पेण येथील एका इमारतीची लिफ्ट कोसळून अपघात झाला. या अपघातात दोनजण जखमी झाले आहेत. लिफ्टचे ऑडिट न झाल्याने हा अपघात झाल्याची तक्रार येथील नागरिकांनी केली आहे. पेण शहरातील प्राईड सिटी या सात मजली इमारतीमधील लिफ्ट अचानक ब्रेक फेल झाल्याने जोरात आदळली. या इमारतीमध्ये जवळजवळ २३५ सदनिका धारक आहेत. इमारतीचा ताबा घेतल्यापासून येथील नागरिकांनी वारंवार बिल्डरकडे लिफ्ट निकृष्ट दर्जाची असल्याची तक्रारसुद्धा केली होती. मात्र, बिल्डरने दुर्लक्षित केल्यामुळ या लिफ्ट दुर्घटनेला सामोरे जावे लागले असे येथील नागरिकांचे म्हणणे आहे. या अपघातात दोन जखमी झालेल्या व्यक्तींना पेणमधील खाजगी रुग्णालयात उपचाराकरिता दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, अपघातामधील दोघांच्याही पायाला गंभीर दुखापत झाल्याची प्राथमिक माहिती असून सोसायटीतील नागरिक आक्रमक झाले आहेत.

# कर्जत पोलीस मित्र संघटनेचे उपोषण सुरु

## सकारात्मक निर्णय न झाल्यास रमेश कदम घेणार जलसमाधी!



**सा.रायगड लोकधारा वृत्त/कर्जत प्रतिनिधी :** कर्जत तालुक्यातील राज्य शासनाच्या महसूल, पाटबंधारे, पंचायत समिती, वृध्द कलावंत आणि दुय्यम निबंधक कार्यालय यांच्या संबंधित प्रश्नांवर कर्जत येथे उपोषण सुरू करण्यात आले आहे. पोलीस मित्र संघटनेचे राज्य उपाध्यक्ष रमेश कदम यांनी हे उपोषण सुरू केले आहे. कदम यांचे संबंधित विषयावरील तिसरे उपोषण असून शासनाने सर्व विषयांवर सकारात्मक निर्णय घेतला नाही तर जलसमाधी आंदोलन करण्याचे असल्याचे जाहीर केले आहे. कर्जत तालुक्यातील जुन्या तहसील कार्यालयाच्या टेकडीवरील इमारती मध्ये दुय्यम निबंधक कार्यालय आहे.ते अद्याप नवीन प्रशासकीय भवन येथे हलविण्यात आलेले नाही. त्याचवेळी कचेरी येथील तहसील कार्यालयात असलेले रेकॉर्ड रूम अद्याप प्रशासकीय भवन येथे हलवण्यात आलेले नाही. त्याचा परिणाम जून दस्त कागदपत्र शोधण्यासाठी धावपळ होत असते. ई-चावडी व ई-फेरफार या योजनेअंतर्गत संगणकावरुन वितरीत करण्यात येणाऱ्या सर्व उताऱ्यांच्या प्रतींवर प्रत्येकी १५ रुपये आकारले जातात. त्यातील पाच रुपये हे शासनाला जमा करावे असे निर्दे श असून देखील करत तहसील कार्यालयाने ती रक्कम शासनाला जमा केलेली नाही. वृद्ध सहाय्यक कलाकार मानधन योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी सर्व कागदपत्रांची पुर्तता केली.मात्र त्यांना लाभ मिळाला नाही त्या सर्व वंचित लाभार्थ्यांना अर्ज दाखल केल्यापासुन आज पर्यंतचा लाभ तात्काळ मिळावा, या मागण्यांसह पाटबंधारे विभागातील उल्हास, पेज, चिल्लार,पाताळगंगा तसेच नाले आणि कालव्यामधील अतिक्रमणे याबद्दल कार्यवाही व्हावी.या सर्व नद्यांमधून बेकायदेशिर पाणी उपसा केला जात असून त्यांच्यावर कारवाई व्हावी आणि नदी नाले या ठिकाणी होणारी बांधकामे त्वरित दूर करण्यात यावी. नविन प्रशासकिय भवन तेथे लीफ्ट नाही, पुरवठा विभागात साईट नसल्याने महिने दोन महिने हेलपाटे मारावे लागतात. उपाय योजना करावी,दिव्यांग नागरिकांसाठी सोय करावी, उपविभाग, तहसील, दुय्यम निबंधक, कार्यालय, नविन प्रशासकिय भवन तेथे जागा अपुरी पडत आहे जागेची व्यवस्था करावी आदी मागण्यांसाठी उपोषण सुरू करण्यात आले आहे. पोलीस मित्र संघटनेचे राज्य उपाध्यक्ष रमेश कदम यांना पाठिंबा देण्यासाठी कर्जत तालुक्यातून सर्व थरातील लोक येत आहेत.

## निवडक

### तळा येथे एनसिडी किटचे वाटप



**तळा :** तळा शहरातील प्राथमिक आरोग्य केंद्र तळा येथे आरोग्य विभाग रायगड जिल्हा परिषद अलिबाग अंतर्गत नागरिकांना एनसिडी किटचे वाटप करण्यात आले. बी.पी.,शुगर या आजारावर तीन महिन्यांच्या गोळ्या या सदर किट मधून देण्यात आल्या आहेत. तळा नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे यांच्या हस्ते २० रूग्णांना या किटचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी प्रा.आ. केंद्र तळाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.गजेंद्र तु.मोधे आरोग्य सहाय्यक नरेश नांदगांवकर, औषध निर्माण अधिकारी निलेश कार्लेकर, आरोग्य सेविका किशोरी करंजे, सिएचओ जिवन राठोड, चैतन्य अनप गट प्रवर्तक नुतन ठिगळे, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय येथील बीसीएम पल्लवी शिंदे व रितेश शहा उपस्थित होते.

### पीएनपीत अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यान



**अलिबाग :** प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील इतिहास विभागाकडून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सवानिमित्त मानवंदना देण्यासाठी, अहिल्यादेवी होळकर यांचे विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी विशेष व्याख्यान आयोजित केले. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून भाऊसाहेब नेने महाविद्यालय पेण येथील इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. उत्तरा खाडिलकर उपस्थित होत्या. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ओमकार पोटे, संचालक विक्रांत वार्डे, कला विभाग प्रमुख डॉ. नम्रता पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रा.मिलिंद घाडगे यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा ओझरता आढावा घेतला. या सोहळ्यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभलेल्या डॉ. उत्तरा खाडिलकर यांनी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर' या विषयावर विद्यार्थ्यांना व उपस्थित सर्वांना सविस्तर मार्गदर्शन केले. त्यामध्ये अहिल्यादेवी होळकर यांच्या आयुष्यातील विविध पैलू ंवर प्रकाश टाकला. आपल्या अध्यक्षीय वक्तव्यामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमकार पोटे यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन चरित्राचा मागोवा घेतला.

# समुद्राच्या पाणी पातळीत वाढ

## पर्यावरणवाद्यांकडून धोक्याचा इशारा; पंतप्रधान कार्यालयाला पत्र

सा.रायगड लोकधारा वृत्त/

**पनवेल प्रतिनिधी :** समुद्राची वाढती पातळी केवळ किनारपट्टीच नव्हे, तर भूगर्भातील पाण्याची पातळी वाढवून अंतर्गत भागातही पूरस्थिती निर्माण करू शकते, असा गंभीर इशारा पर्यावरणवादी संस्था नॅटकनेक्ट फाउंडेशनने थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दिला आहे. यासंदर्भात पंतप्रधान कार्यालयाला नॅटकनेक्ट फाउंडेशनने पत्र पाठवून धोक्याची सूचना दिली आहे. न्यूझीलंडमधील नवीन संशोधन अहवालाचा हवाला देत संस्थेने आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने यासाठी सज्ज राहण्याची गरज असल्याची भावना व्यक्त केली आहे. नॅटकनेक्ट फाउंडेशनने पंतप्रधान कार्यालयाला पाठवलेल्या पत्रानुसार, न्यूझीलंडमधील डुनेडिन या किनारपट्टीवरील शहरावर आधारित एका नवीन संशोधनात असे दिसून आले आहे, की समुद्राची वाढलेली पातळी भूगर्भातील पाण्याची पातळी बदलू शकते. यामुळे अंतर्गत भागात पूरस्थितीचा धोका वाढू शकतो. हे संशोधन एजीयू या पृथ्वी आणि अंतराळ विज्ञानातील तज्ज्ञांच्या जागतिक संस्थेने प्रकाशित केले आहे. संशोधनानुसार दक्षिण डुनेडिनमध्ये आधीच अधूनमधून पूर येत आहेत, जे समुद्राची पातळी वाढल्याने अधिक गंभीर होऊ शकतात. याप्रकरणी



नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी. एन. कुमार यांनी हे निष्कर्ष पाणथळ जागांचे जतन करण्याच्या त्यांच्या दीर्घकालीन मागणीला बळकटी देत असल्याचे सांगितले आहे. तसेच पाणथळ जागा शहरी स्पंज म्हणून काम करतात आणि नदीच्या पूरक्षेत्राचे संरक्षण करतात. पायाभूत सुविधांचा विकास या नावाखाली जलसाठे बुजवण्याऐवजी पाण्याचा विस्तार होण्यासाठी जागा राखण्याची तातडीने गरज आहे, असे सांगितले आहे. सरकारने पर्यावरणविरोधी धोरणे टाळून आणि पर्यावरणीय आपत्तींना गांभीर्याने घेऊन आपत्ती प्रतिबंधासाठी सज्ज राहण्याची वेळ आली आहे, असे कुमार म्हणाले.

**केंद्राकडून दखल : केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने (एमओईएफसीसी) भारतीय भूगर्भीय सर्वेक्षणासोबत मिळून समुद्राच्या वाढत्या पातळीचा अभ्यास करताना किनारपट्टीवरील भूगर्भातील पाण्याच्या पातळीची तपासणी करावी, अशी मागणी नॅटकनेक्ट फाउंडेशनने केली आहे. भारताला ७, ५०० किमीपेक्षा जास्त लांबीची किनारपट्टी आहे. किनारपट्टीवरील धूप वगळता समुद्राच्या वाढत्या पातळीमुळे निर्माण होणाऱ्या धोक्यांवर कोणतीही गंभीर चर्चा झालेली नाही, असे त्यांनी निदर्शनास आणले. यावर पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने नॅटकनेक्ट फाउंडेशनने मांडलेल्या चिंतांची दखल घेतली असून, धोरणात्मक चौकट तयार करताना या मुद्द्यांचा विचार केला जाईल, असे आश्वासन दिले आहे.**

# ग्राहकाचे पावणेदहा लाख घेऊन खेळला ऑनलाईन जुगार!




सा.रायगड लोकधारा वृत्त/

**पनवेल प्रतिनिधी :** गाडी खरेदीसाठी ग्राहकाने दिलेले पैसे जमा न करता, शोरुममधील कर्मचाऱ्याने ते पैसे ऑनलाईन जुगारात लावल्याचा धक्कादायक प्रकार पनवेमध्ये उघडकीस आला आहे. स्कोडा कार शोरुममध्ये ही घटना घडली असून, याप्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली आहे. स्वप्नील क्षीरसागर यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. त्यांनी गारनेट मोटर्स पनवेल या स्कोडा कारच्या शोरुममध्ये सेल्स एक्झिक्युटीव्ह म्हणून काम पाहणारा सागर चव्हाण याला स्कोडा कुशाक गाडी खरेदीकरिता जवळपास ९ लाख ७० हजार ६९९ रुपये जमा करण्यास दिले होते. मात्र गाडी खरेदीसाठी ग्राहकाने दिलेले हे पैसे शोरुममध्ये जमा न करता सागर चव्हाण याने पैसे जमा केल्याबातच्या बोगस पावत्या तयार केल्या आणि त्या ग्राहक स्वप्नील क्षीरसागर यांना दिल्या. ग्राहकाने दिलेले ९ लाख ७० हजार रुपये सेल्स एक्झिक्युटीव्ह सागर चव्हाण याने ऑनलाईन जुगारात खर्च केले. क्षीरसागर गाडीबाबत चौकशीसाठी गेल्यानंतर ही बाब उघडकीस आली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात सागर चव्हाण विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ग्रामपंचायत निवडणुका एप्रिल अखेरीस होणार?

याकडे सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष लागले आहे. मागील निवडणुकांमध्ये चुकीची प्रभाग रचना झाल्याने तसेच बहिष्कार व इतर कारणांमुळे ग्रामपंचायतीच्या निवडणुका होऊ शकल्या नाहीत. जिल्ह्यातील अशा २२० ग्रामपंचायतींची सार्वत्रिक आणि १११ ग्रामपंचायतींची पोटनिवडणूक होण्याची शक्यता आहे. त्यानुसार मतदार याद्या अद्यावतीकरणाचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.



**विधानसभा निवडणुकीचे पडसाद :** ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये राजकीय पक्षांचा थेट संबंध येत नसला तरी ग्रामपंचायतींमध्ये आपल्याच पक्षाचे वर्चस्व असावे यासाठी राजकीय पक्षांचा आटापिटा सुरू असतो. सत्ताधारी किंवा विरोधी पक्ष कोणत्याही एका पक्षाच्या झेंडघाखाली निवडणूक न लढवता स्थानिक विकास आघाड्या स्थापन करुन निवडणुका लढविण्याची शक्यता आहे. २०१९ पूर्वी रायम्ड जिल्ह्यातील ग्रामपंचायतींवर शेतकरी कामगार पक्ष आणि शिवसेनेचे वर्चस्व होते. मात्र अलीकडच्या काळात शकापला आओहोटी लागल्याचे चित्र आहे. इच्छुकांची तयारी सुरु गावाच्या विकासाची बहुतांश सूत्रे ही सरपंचाच्या हातात असल्याने ग्रामपंचायतीच्या निवडणुकांना अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. विधानसभा निवडणुकीपासूनच याची इच्छुक उमेदवारांकडून पायाभरणी सुरू झाली होती. विधानसभा निवडणुकीत लागलेल उमेदवार ग्रामपंचायत निवडणुकासाठी जोमाने कामाला लागले आहेत. त्याचचराबर प्रशासकीय स्तरावरही निवडणुकांची तयारी सुरू झाली आहे. इच्छुकांनी निवडणूक लढवण्यासाठी लागणारी कागदपत्रे जमवण्याची तयारी सुरू केली आहे. जिल्ह्यातील काही आकाराने मोठ्या ग्रामपंचायतींचा यात समावेश असून सरपंचपदाच्या निवडणुकीकडे सवांचे लक्ष लागले आहे.

पान १ वरून

### पाण्याचा दुष्काळ

करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरु केला आहे. अलिबाग तालुक्यातील रेवस गावाला एक टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरू करण्यात आला आहे.

### पत्नीच्या छळाला कंटाळून पतीची आत्महत्या!

याबाबत अकस्मात मृत्युची नोंद करण्यात करण्यासाठी रजिस्टर कार्यालयात नोंदणी केली होती. त्यामुळे मानसिक तणावाखाली आलेल्या राज पोकळे याने २४ जानेवारी रोजी दुपारी उलवे येथील घरामध्ये आत्महत्या केली होती. आल्यानंतर पोलिसांनी या प्रकरणाचा तपास केला. यादरम्यान राज पोकळे याने पत्नीकडून होत असलेल्या मानसिक छळामुळे आत्महत्या केल्याचे उघडकीस आले. उलवे पोलिसांनी राज पोकळे याच्या आईने दिलेल्या तक्रारीवरुन अक्षता चौलकर हिच्या विरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. तसेच पुढील कारवाईला सुरुवात केली आहे.

# बेकायदा मासेमारीला शासनाचे डिझेल

## कोट्यवधींचा डिझेल घोटाळा | काँग्रेसचे मिल्टन सौदिया यांचा आरोप

**सा.रायगड लोकधारा वृत्त/उरण प्रतिनिधी :** शासनाच्या अनुदानित डिझेलचा गैरवापर करून पालघर किनारपट्टीसह महाराष्ट्राच्या सागरी हद्दीत बेकायदा पर्ससीन आणि एलईडी मासेमारी सुरू असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश फिशरमन काँग्रेसचे मुख्य समन्वयक मिल्टन सौदिया यांनी केला आहे. सौदिया यांनी मत्स्य आयुक्त किशोर तावडे आणि मत्स्यमंत्री नितेश राणे यांच्या निदर्शनास हा मुद्दा आणून दिला असून, बोटींच्या परवान्यांची तपासणी करूनच डिझेल कोटा मंजूर करण्याची मागणी केली आहे. शासनाने निर्बंध लागू करूनही बेकायदा मासेमारीसाठी डिझेल वितरीत होत असल्याने मोठ्या घोटाळ्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. शासनाच्या



आदेशानुसार पर्ससीन मासेमारीस निर्बंध असूनही अवैधरित्या मासेमारी सुरू आहे. मुंबई, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात बेकायदा मासेमारी सुरू असून, डिझेल कोटा मंजुरीसाठी अनियमितता, अर्थपूर्ण भेटीनंतर निर्णय बदलला असल्याचे समजते, असेही सौदिया म्हणाले. मत्स्य खात्यातील अधिकाऱ्यांकडून वर्षानुवर्षे डिझेल वितरणात घोटाळा सुरू असून, कोट्यवधी रुपयांचा अपहार केला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे अनुदानित डिझेल वितरणावर कठोर नियंत्रण ठेवण्याची गरज असल्याचे सौदिया यांनी म्हटले आहे.


# अपूर्ण रस्त्यामुळे अपघाताचा धोका



**सा.रायगड लोकधारा वृत्त/कोलाड वार्ताहर :** मुंबई-गोवा महामार्गावरील गोवे गावाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या मुख्य चौकात येथील दोन्ही बाजूची वाहतूक एकाच मार्गाने वळविण्यात आली आहे. मुंबईकडून कोलाडकडे जाणाऱ्या वाहतूकीसाठी दिशादर्शक फलक लावण्यात आलेला आहेत. परंतु, कोलाडकडून मुंबईकडे जाणाऱ्या रस्त्यावर दिशादर्शक फलक लावण्यात आलेला नाही. या एकेरी रस्त्याने जात असताना वाहन चालकांना अचानक दुसऱ्या बाजूला जावे लागत आहे. त्यामुळे या महामार्गावर अपघाताचा धोका वाढला असुन विद्यार्थ्यांसहित प्रवाशांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. एखादा मोठा अपघात झाला तर याला संबंधित ठेकेदार जबाबदार असेल, अशी संतप्त प्रतिक्रिया प्रवासी वर्गातून व्यक्त केली जात आहे. मुंबई-गोवा महामार्गावरील पुई येथील महिसदरा नदीवरील नवीन पुलाचे काम सुरु आहे. त्यामुळे या मार्गावरून ये-जा करणारी वाहतूक जुन्या पुलावरून वळविण्यात आली आहे. परंतु, कोलाड बाजुकडून येणारी वाहतूक गोवे गावाकडे जाणाऱ्या मुख्य चौकात आल्यानंतर येथे कोणताही दिशादर्शक फलक नसल्याने दुसऱ्या बाजूकडे जाण्यासाठी वाहन चालकांची तारंबल उडत आहे. त्यामुळे या अपूर्ण रस्त्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. त्यातच या महामार्गावरील पुई पेट्रोल पंपा समोरून गोवे गावाकडे जाणारा रस्ता हा ठेकेदाराच्या मनमानी कारभारामुळे अपूर्ण राहिलेला आहे. स्थानिकांनी या रस्त्याचे काम पूर्ण करण्यासाठी आंदोलन केले होते. त्यावेळी होळीनंतर हे काम पूर्ण केले जाईल, असे संबंधित ठेकेदाराने आश्वासन दिले होते. परंतु, ठेकेदाराच्या मनम नी कारभारामुळे अद्याप हे काम पूर्ण झालेले नाही. या ठिकाणी रस्ता ओलांडताना ही तारेवरची कसरत करावी लागत आहे. तर, कोलाडकडून येणारी वाहने सरळ दुसऱ्या बाजुकडे उभ्या असणाऱ्या प्रवाशांच्या समोर येत आहेत. त्यामुळे त्यांना आपला जीव मुठीत धरून उभे राहावे लागत आहे.

# उरणमध्ये पुन्हा चोरट्यांचा धुमाकूळ


## घरफोडीत ११ लाखांचा ऐवज लंपास



**सा.रायगड लोकधारा वृत्त/उरण वार्ताहर :** उरण तालुक्यातील पाणदिवे गावातील बंद घर फोडून चोरट्यांनी सोन्याच्या दागिन्यांसह रोकड असा एकूण ११ लाखांचा ऐवज लंपास केला आहे. चोरट्यांचा हा धुमाकूळ सोमवारी (दि.३१) रात्रीच्या सुमारास सुरू होता. याप्रकरणी नरेश पंढरीनाथ पाटील यांनी उरण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार उरण पोलीस कारवाई करीत आहेत. तालुक्यात चोरट्यांनी पुन्हा एकदा आपले हातपाय पसरायला सुरुवात केली आहे. त्या संदर्भात उरण पोलीस यंत्रणा सतर्क झाली असून त्यांनी जनतेला सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. त्यातच पाणदिवे गावातील नरेश पाटील हे सोमवारी कोप्रोली येथे गेले होते. रात्री ११ वाजताच्या सुमारास पुन्हा आपल्या घरी आले असता, त्यांच्या बंद घरातील दरवाजा उघडा दिसला. त्याचबरोबर घरातील सामान देखील अस्थाव्यस्थ पडलेले होते. घरातील कपाट उघडून कपाटातील सामान विखुरलेल्या अवस्थेत पडले होते. अधिक पाहणी केली असता कपाटातील १ लाखाची रोकड व १० लाख किंमतीचे दागिने चोरीला गेल्याचे आढळून आले. या घटनेची माहिती उरण पोलिसांना देण्यात आली. या चोरी संदर्भात पोलीस चोरट्यांचा शोध घेत आहेत.

# सरकारने मच्छिमारांना सोडले वाऱ्यावर

## एक वर्षापासून डिझेल परताव्याची रखडपट्टी



**सा.रायगड लोकधारा वृत्त/ठाणे प्रतिनिधी :** मीरा-भाईंदरमधील शेकडो मच्छिमारांना सरकारने अक्षरशः वाऱ्यावर सोडले आहे. गेल्या वर्षभरापासून २० ते २५ कोटी रुपयांचा डिझेल परतावा प्रशासनाने लटकवून ठेवल्याने मच्छिमारांना अनेक संकटांना सामोरे जावे लागत आहे. सरकारच्या या बेफिकीर कारभारामुळे मीरा-भाईंदरसह सातपाटी, वसईमधील मच्छिमारीही संकटात सापडली आहे. मीराभाईंदरमधील भूमिपुत्र मच्छिमारांनी आता आक्रमक पवित्रा घेतला असून लवकरात लवकर डिझेल परतावा द्यावा, अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. मीरा-भाईंदरमधील उत्तन, पाली, चौक, डोंगरी, तारोडी चौक या भागातील हे मच्छिमार आहेत. मच्छिमार बोटींची संख्या सुमारे ९५० एवढी असून शेकडो कुटुंबे या व्यवसायावर अवलंबून आहेत. उत्तन मच्छिमार व वाहतूक सोसायटी लिमिटेड, उत्तन मच्छीमार विविध कार्यकारी सहकारी सोसायटी, दी डोंगरी चौक फिशरमेंन सर्वोदय सहकारी सोसायटी, पाली-उत्तन मच्छिमार सहकारी सोसायटी, भाटे बंदर मच्छिमार सोसायटी अशा पाच संस्था कार्यरत आहेत. या संस्थांच्या वतीने गेले काही महिने हक्काचा डिझेल परतावा मिळावा यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीचे कार्याध्यक्ष बर्नड डिमेलो यांनी दिली. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड जिल्ह्यातील मच्छिमारांना लवकर डिझेल परतावा मिळतो. मात्र, ठाणे व पालघर जिल्ह्यातील मच्छिमारांना उशिरा परताव्याचे पैसे दिले जातात, असा आरोप बर्नड डिमेलो यांनी केला आहे. मीरा-भाईंदरमधील मच्छिमारांना त्वरित डिझेल परतावा मिळावा यासाठी कृती समितीच्यावतीने अनेक वेळा पाठपुरावा केला. परंतु, विविध कारणे सांगून त्याचे पैसे दिले जात नाहीत.

**विधिमंडळातही उठवला आवाज :** **राज्यातील मच्छिमारांचा डिझेल परतावा त्वरित देण्यात यावा यासाठी विधिमंडळात काही लोकप्रतिनिधींनी आवाज उठवला होता. त्यावर सरकारने थातूरमातूर उत्तर दिले. लोकप्रतिनिधींचेही सरकार ऐकत नसेल तर आम्ही जायचे कोणाकडे, असा संतप्त सवाल मच्छिमारांनी केला आहे.** **प्रस्ताव दिल्यास त्वरित मंजुरी :** **मीरा-भाईंदरमधील शेकडो मच्छिमारांचा गेल्या १३ महिन्यांपासून डिझेल परतावा सरकारी बाबूंनी लटकवला आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता १५० कोटी रुपयांची तरतूद डिझेल परताव्यासाठी करण्यात आलेली आहे. त्यापैकी १२६ कोटींचा निधी वितरित केला असून अन्य मच्छिमार खातेदारांनी प्रस्ताव सादर केल्यास तो त्वरित मंजूर करण्यात येईल, असे मत्स्य व्यवसाय विभागाचे सहाय्यक आयुक्त दिनेश पाटील यांनी सांगितले.**

# बेस्ट वाहकाकडून प्रवाशाला मारहाण

**सा.रायगड लोकधारा वृत्त/मुंबई प्रतिनिधी :** बेस्टच्या वाहकाने प्रवाशाला मारहाण केल्याची घटना घडली आहे. बस मार्ग क्रमांक ३८२ सिरीयल नंबर ३९, बस क्रमांक ६९४१ ची बस देवनार आगाराची असून सहार कार्गो ते अणुशक्ती नगर अशी जात असताना घाटकोपर आगाराच्या मागे साधारण १२.०० वाजण्याच्या दरम्यान दोन मुले बसमध्ये चढली. बस वाहकाने प्रथम तिकिटाबद्दल विचारले असता मुले मोबाईलमध्ये खेळत होती म्हणून इतर प्रवाशांचे तिकीट काढून पुन्हा त्यांना तिकीट काढण्याबद्दल विचारले असता त्यांच्यामध्ये शाब्दिक बाचाबाची झाली. यावेळी झालेल्या बाचाबाचीप्रसंगी वाहकाने मुलाच्या कानशिलात लगावल्याचा प्रकार घडला आहे.

रायगड लोकधारा
NEWS
RNI No. MAHMAR/2013/48622
बातम्या आणि जाहिरातीसाठी
संपर्क साधा :- ८३६९३९४३७२
सा.रायगड लोकधारा वृत्तपत्र /
रायगड लोकधारा न्यूज चॅनल
Www.raigadlokdharanews.in

## उमटे धरणातील गाळ

# निविदांच्या विळख्यात

**सा.रायगड लोकधारा वृत्त/**

**अलिबाग प्रतिनिधी :** उमटे धरणातील गाळ सामाजिक बांधिलकीतून काढल्यानंतर धरणाच्या दुरुस्तीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग खडबडून जागे झाले. या धरणातील दुरुस्ती व गाळ काढण्यासाठी ठेका देण्याकरिता गेल्या अनेक महिन्यांपासून निविदा प्रक्रिया राबविली जात आहे. मात्र, ही प्रक्रिया अजूनही पूर्ण न झाल्याने धरणातील गाळ निविदाच्या विळख्यात सापडल्याचे चित्र समोर येत आहे. अलिबाग तालुक्यातील उमटे धरणातील गाळ काढण्यासाठी म हाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने अलिबाग तालुक्यातील उमटे धरण गेल्या ४७ वर्षांपूर्वी बांधले आहे. १९७८ ला या धरणाची निर्मिती झाली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून जिल्हा परिषदेला १९९५ मध्ये हस्तांतरित करण्यात आले. त्यामुळे गेल्या ३० वर्षांपासून जिल्हा परिषदेच्या ताब्यात हे धरण आहे. या धरणाची उंची ५४.६० मीटर इतकी आहे. पाण्याची शेवटची पातळी ४० मीटर इतकी आहे. या धरणामार्फत १२ ग्रामपंचायतींमधील ४६ गावे, ३३ वाड्यांमधील ६५ हजारांहून अधिक नागरिकांना पाणीपुरवठा केला जातो. उमटे धरण गाळात रुतल्याने शेकापच्या जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी सामाजिक बांधिलकी जपत सीएफटीआयच्या मदतीने धरणातील गाळ मागील वर्षी मे महिन्यात काढला. अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांनीदेखील गाळ काढण्यासाठी मदतीचा हात दिला. त्यानंतर प्रशासन खडबडून जागे झाले. उमटे धरणाची दुरुस्ती व गाळ काढण्यासाठी निविदा काढण्याची हालचाल सुरु झाली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत जलजीवन अंतर्गत उमटे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना अस्तित्वातील उमटे धरणाची दुरुस्ती व गाळ काढण्यासाठी सुमारे ८ कोटी ८१ लाख ३५ हजार रुपयांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. गेल्या अनेक महिन्यांपासून ही निविदा प्रक्रिया सुरु आहे. या कामासाठी दोन कंपन्यांकडून निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्यांची तांत्रिक तपासणी करून पुढील प्रक्रिया राबविली जाणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. एप्रिल महिना सुरु झाला आहे. पावसाळा सुरु होण्यासाठी दोनच महिने शिल्लक राहिले आहेत. निविदांच्या विळख्यात सापडलेल्या या धरणाचे काम आता पुन्हा लांबणीवर जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे.



**1** शेकापच्या जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील आणि अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या पुढाकारातून गतवर्षी धरणातील गाळाचा उपसा करण्यात आला.

**2** यावर्षी धरणातील गाळ काढण्यासाठी दोन कंपन्यांकडून निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्यांची तांत्रिक तपासणी करून पुढील प्रक्रिया राबविली जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

> **“उमटे धरणाची दुरुस्ती व गाळ काढण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या. सुरुवातीला दोन वेळा काहीही प्रतिसाद मिळाला नाही. आता दोन कंपन्यांकडून प्रतिसाद मिळाला आहे. तांत्रिक पडताळणी केल्यानंतर निविदा उघडून पात्र असलेल्या कंपनीला कामाचा ठेका दिला जाईल. या प्रक्रियेला महिना लागेल. त्यामुळे मे महिन्यात गाळ काढण्याची शक्यता आहे. – मुनाब शेख, उपअभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अलिबाग”**

## पडीक जागेवर बांबू लागवड करा–ना.भरत गोगावले

### पोलादपूरात प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मंजूर कामांचे भूमिपूजन



**सा.रायगड लोकधारा वृत्त/पोलादपूर प्रतिनिधी :** तालुक्यातील उद्योजक गोविंद चोरगे यांनी पाण्याचा नवीन प्लांट उभा केला आहे, त्याचा आदर्श तरुणांनी घेत लघुउद्योग करावे. शेतकरीवर्गाने पडीक जागेवर बांबूची लागवड करावी, असे आवाहन रोहयो मंत्री भरत गोगावले केले. त्यामुळे शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यास मदत होईल. त्यासाठी लागणारे सहकार्य मंत्री म्हणून मी करेन, अशी ग्वाही त्यांनी दिली. पोलादपूर तालुक्यामध्ये प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मंजूर झालेल्या कामांचा भूमिपूजन मंगळवारी, १ एप्रिल रोजी संपन्न झाले. खडकवाडी ते चिखली ते खोतवाडी सिमेंट काँक्रीट रस्ता ४ कोटी ३४ लक्ष, कामथे ते चांदले ते धनगरवाडी सिमेंट काँक्रीट रस्ता ५ कोटी ६२ लाख रुपये या मोठ्या कामांचा भूमिपूजन रोजगार हमी मंत्री भरत गोगावले, विधानपरिषद गटनेते आमदार प्रवीण दरेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ना.गोगावले बोलत होते. यावेळी साखर येथे गोविंद चोरगे यांच्या सावित्री पॅकेज अँड ड्रिंकिंग वॉटर प्लांटचे उद्घाटन प्रवीण दरेकर यांच्या हस्ते करण्यात आले. आमदार प्रवीण दरेकर यांनी कोकणातल्या तरुणांनी उद्योगधंद्यासाठी पुढे यावे त्यांना मुंबई बँक मार्फत सहकार्य केले जाईल. लाडकी बहिणीसाठी ता बँकेमार्फत शून्य रुपये निहाय सुमारे ८० हजार खाती उघडण्यात आली होती या बहिणींना १५०० रुपयांचे १५ हजार कसे होतील याचे धोरण बँके मार्फत आखण्यात आले असून त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी आपण बँके मार्फत सहकार्य करणार असल्याची ग्वाही दिली.

## गुंडगेतील महिलांचे पाण्यासाठी उपोषण




**सा.रायगड लोकधारा वृत्त/कर्जत प्रतिनिधी :** कर्जत शहरातील गुंडगे येथे पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नासाठी महिलांना संघर्ष करावा लागत आहे. कमी दाबाने, अनियमित पाणीपुरवठ्याबाबत तक्रारी करुनही कर्जत नागरपरिषदेकडून सहकार्य मिळत नसल्याने, त्रस्त महिलांनी मंगळवार (१ एप्रिल) पासून उपोषण सुरु केले. गुंडगे भागात पाणी सोडण्याची सकाळची वेळ निश्चित करावी, जादा दाबाने आणि अधिक वेळ पाणीपुरवठा करण्याची हमी द्यावी, पाणीपुरवठा विभाग अभियंत्यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन समस्या सोडवाव्यात आदी मागण्या करण्यात आल्या असून, पाणी संघर्ष समितीने यासाठी उपोषण सुरु केले आहे. कर्जत नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाच्या विरोधात महिलांनी आवाज उठवला आहे. मागील १८ मार्च आणि २४ मार्च रोजी पत्रव्यवहार करुन प्रशासनाला समस्या कळवण्यात आल्या होत्या. मात्र, २९ मार्चला मिळालेल्या उत्तरात केवळ एका मागणीवर कार्यवाही करण्यात आली, उर्वरित तीन मागण्यांवर कोणताही निर्णय न घेतल्याने महिलांनी उपोषणाचा मार्ग अवलंबला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून सकाळच्या वेळेत नियमित पाणीपुरवठा होत होता, परंतु कर्जत नगरपरिषदेने कोणतीही सूचना न देता अचानक वेळेत बदल केला. यामुळे महिलांना दिवसभर पाण्यासाठी थांबावे लागते, त्याचा इतर कामांवर परिणाम होत आहे. कमी दाबाने व कमी वेळ मिळणाऱ्या पाणीपुरवठ्यामुळे संतप्त महिलांनी आपल्या हक्कासाठी रस्त्यावर उतरण्याचा निर्णय घेतला आहे. गुंडगे गावातील तसेच संत रोहिदास नगर, पंचशील नगर आणि ठाकूरवाडी भागातील महिलांनी उपोषणाचे हत्यार उगारले असून कर्जत संघर्ष समिती आणि संघर्ष समितीचे प्रमुख अॅड.कैलाश मोरे यांनी उपोषणाला पाठिंबा दिला आहे.

## पनवेल येथे डंपरच्या धडकेने कामगाराचा मृत्यू

**सा.रायगड लोकधारा वृत्त/**



**पनवेल प्रतिनिधी :** डंपरच्या धडकेने एका कामगाराचा मृत्यू झाल्याची घटना गव्हाण फाटा परिसरात घडली आहे. सदर ठिकाणी काम चालू असलेल्या साईटवर गव्हाण फाट्याजवळील जुना रोडवर चंदन जगबहादूर राम (३१) सदर ठिकाणी हा काम करीत असताना मातीचा भराव करण्यासाठी माती भरुन आलेल्या डंपरवरील चालकाने तो चालवित असलेला डंपर हा माती टाकण्यासाठी पाठीमागे रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून अविचाराने जोरात रिव्हर्स चालवित घेत असताना सदर डंपरची धडक या कामगाराला बसल्याने त्यात तो जमिनीखाली पडून सदर मातीने भरलेल्या डंपरचे चाक त्याच्या अंगावरुन गेल्याने त्याचा मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलिसात करण्यात आली आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक, विजय चंद्रकांत गायकर यांनी रोशन प्रिंटर्स, शॉप नं.०४ / ०५, प्रकाश निवास, प्लॉट नं.१३४/ ०१, आगरी समाज हॉल जवळ, पनवेल, रायगड महाराष्ट्र – ४१० २०६ येथे छापून मु. पो. पोयंजे, ता. पनवेल , जि. रायगड, महाराष्ट्र – ४१० २०६ येथून प्रकाशित केले. लेखांतून व्यक्त होणाऱ्या मतांशी संपादक सहमत असतीलचं असे नाही. सर्व वाद पनवेल न्याय कक्षेत. ( ८३६९३९४३७२ / ९१३६५३९५६० ) / Facebook :- vijay gaikar / Whatsapp No. ९१३६५३९५६० /
संपादक : विजय चंद्रकांत गायकर
Email Id :- Gaikarvijay26@gmail.com
RNI No. MAHMAR/2013/48622